# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड दुपारची प्रेस नोट दिनांक २७/०७/२०१८**

**अंतरराज्यीय दरोडा टाकण्याची टोळी एल.सी.बी. च्या जाळयात**
**04 अटक तर 01 फारार**
**आरोपींनी दिली खुनाच्या गुन्हयाची कबुली**

मा. पोलीस अधीक्षक, नांदेड, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे व पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा नांदेड यांचे आदेशान्वये पोलीस ठाणे शिवाजीनगर नांदेड गु.र.नं. 27/2018 कलम 302 भादंवि मधील आरोपीचा शोध कामी व गुन्हयाचे तपास कामी नांदेड शहरात पेट्रोलींग करीत असताना, सपोनि दिघोरे यांना गोपनिय माहीती मीळाली की, तेलंगणा राज्यातील कामारेडडी भागातील काही सऱ्हाईत गुन्हेगार पोलीस ठाणे विमानतळ हाद्दीतील नवीन बायपास रोड महेबुबनगर ते देगलुर नाका जाणाऱ्या रोडवरील रेल्वेचे आंडरग्राऊंड पुलाजवळ दरोडया सारखा मोठा माली गुन्हा करण्याचे तयारीने दबा धरुन बसलेले आहेत. असी खात्रीशीर माहीती मीळाली. सदरची माहीती वरिष्ठांना देऊन त्यांचे सुचना व मार्गदर्शन प्रमाणे साफळा रचुन त्या ठिकाणी छापा मारला असता, एकुन चार ईसम मीळुन आले.व एक ईसम आंधाराचा फायदा घेऊन रेल्वे पटरीने पळुन गेला. छापा दरम्यान ताब्यात मिळुन आलेल्या ईसमांची नांवे 01) पी. नवीन पी. राजन्ना रा.गंन्नाराम वय 25 वर्ष धंदा कॅट्रीन रा. गन्नाराम ता. डीचपल्ली जि. निझामाबाद, 02) सयद अहेमद सयद आजम वय 24 वर्ष धंदा कॅट्रीन काम रा. जल्लापल्ली फारम ता. कोडगीरी जि. निझामाबाद, 03) दिनेश मेघराजसिंह परमार वय 19 वर्ष धंदा मेकॅनीक रा. आकाश नगर, कॅनॉल रोडेन, विष्णुपुरी, नांदेड , 04) आर्जुन भारत डोंगरे वय 20 वर्ष धंदा नोकरी कॅट्रस, रा. महेबुबनगर, माहाकाली मंदीराचे जवळ, नवीन बायपास रोड, नांदेड असे असल्याचे व पळुन गेलेला ईसम नामे 05) जी. प्रवीण जी. दामला रा.रेडडीपेठ तांडा यांचे विरुध्द पोलीस ठाणे गांधारी (कामारेडडी) असा असुन, त्याचे विरुध्द घरफोडी व जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहीती मीळुन आली आहे.

तसेच सदर ताब्यातील आरोपींना अधीक विश्वासात घेऊन व गोपनिय माहीतीच्या अधारे विचारपुस केली असता, त्यांनी सांगीतले मागील दिनांक 18/06/2018 रोजी रात्री आठ ते साडेनऊ वाजण्याचे सुमारास अर्जुन डोंगरे यांचे सांगणे वरुन व मोबाईल फोन चोरण्याचे कारणावरुन, त्यास भांडण करणारा नितीन बबन इंगोले रा. महेबुबनगर, नवीनबायपास, नांदेड यास नविन बायपासचे देशी दारु आडयातुन घेऊन जाऊन, विश्वासाने बोलत-बोलत रोडने रेल्वेपटरीकडे अंडरग्राऊंड ब्रिजकडे आंधारात घेऊन जाऊन, माळटेकडी रेल्वे स्टेशन समोर रेल्वे - मालगाडी थांबण्याचे ठिकाणी, गोडाऊनचे पुर्व बाजुस बाभळीचे झाडाखाली आरोपी पी. नवीन व नितीन इंगोले यांच्यात वाद-वाढला, बोला-बोली झाली, हातापाई झाली, नितीन इंगोले हा एकदम नवीनचे आंगावर मारण्यास धाऊन गेला. तेंव्हा आरोपी जी. प्रवीण, अर्जुन डोंगरे व दिनोश असे तीघे मीळुन नितीन इंगोले यास पकडले. पी. नवीन, सयद अहेमद यांनी खंजरने आळीपाळीने नितीन इंगोले यास कानाजवळ व डोक्यात गंभीर मारुन त्यास ठार मारले. त्यानंतर त्यांचे प्रेत जाग्यावरुन उचलुन, रिअर ॲटोने थोडे आंतरावर आणुन, आंदाचे साडे नऊ वाजण्याचे सुमारास त्याचे प्रेत रेल्वे पटरीवर टाकुन निघुन गेले, असे सविस्तर हकीकत सांगीतले. त्यावरुन त्या सर्व दरोडा टाकण्याचे तयारीत मिळुन आलेले आरोपी कडुन दोन चोरीच्या मोटार सायकली, तलवार, तीन खंजर, तसेच एअरगण पिस्टल, चाव्यांचा गुच्छ, मोठे दोरखंड व ईत्यादी साहीत्य जप्त करण्यात आले आहे. त्यानंतर दरोडयाचे गुन्हयात व खुनाचे गुन्हयात त्यांना अटक करुन तपास करणे कामी पोलीस ठाणे विमानतळ येथे वर्ग करण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, नांदेड, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे व पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा नांदेड यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील सपोनि श्री विनोद दिघोरे, पोलीस उप निरीक्षक, कल्याण नेहरकर, पोलीस उप निरीक्षक सदानंद वाघमारे, पोलीस जमादार दशरथ जांबळीकर, बालाजी सातपुते, राजु पांगरेकर, मनोजसिंह परदेशी, मोतीराम पवार, दादाराव श्रीरामे, संग्राम केंद्रे यांनी केली असुन, सदर पथकांचे मा. पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी अभिनंदन केले आहेत.

सविनय सादर

पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.नांदेड.